# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ २५६७६२३४ फॅक्स २५६७६२३४ **Email : jdtepu@pn3.vsnl.net.in**


जा.क्र. तिशपु/आस्था-२/अनु./विना.अनु/रिक्त जागा/०७/ ६३११ दिनांक- 18 DEC 2007

प्रति,

सर्व शासकीय अनुदानित/विनाअनुदानित

अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र,

हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच

एमबीए/एमएमएस/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्थेतील शिक्षकांच्या रिक्त जागा त्वरीत भरणेबाबत.

संदर्भ :- मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/रिक्त जागा/२००७/१०६१ दिनांक १७ नोव्हेंबर २००७

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपले संस्थेत सुरु असलेल्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, व अधिव्याख्याता यांच्या जागा रिक्त असल्यामुळे विद्यापीठाला शिक्षक वर्गाच्या कमतरतेमुळे निकाल देण्यास अडचणी निर्माण होतात. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे शिक्षकीय पदे भरणे आवश्यक आहे. परंतु बहुतांशि संस्थेमध्ये प्राध्यापक, सहायक प्राध्यापक व अधिव्याख्यातांच्या जागा रिक्त आहेत, असे मुख्य कार्यालयास आढळून आले आहे.

सदर विषयाबाबतचे मा. संचालक, तंत्रशिक्षण,म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/रिक्त जागा/२००७/१०६१ दि.१७ नोव्हें. २००७ सोबत जोडले आहे. कृपया ते अवलोकनार्थ घावे. व त्यामधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(गो.पं.चौधरी)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांना मानार्थ अग्रेषित.

प्रत :- श्री. शिंदे, प्रोग्रॅमर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्र व सोबतचे संचालकांचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात यावे.

F:\sandbhor\manyata.doc\9

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६१०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६१२१०१.

तार - EDUTECH E-mail : desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांक : २/एनजीसी/रिक्त जागा/२००७/ १०६१

दिनांक : 17 NOV 2007

प्रति,
प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र,
वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी
पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस/
एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.

**विषय :** अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्थेतील शिक्षकांच्या रिक्त जागा त्वरीत भरणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे शिक्षकीय पदे विशेषतः प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक व अधिव्याख्याता यांच्या जागा रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. तसेच संस्था क्वालिटी एज्युकेशन देऊ शकत नाही. संबंधित विद्यापीठाकडून अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस/एमसीए पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पेपर तपासणीचे कामामध्ये दिरंगाई होत आहे. परिणामी विद्यापीठाचा निकाल उशिरा लागतो.

वरील बाब लक्षात घेऊन आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक व अधिव्याख्यात्यांची रिक्त असलेली पदे त्वरीत भरावी व याबाबतचा अहवाल विभागीय कार्यालयास सादर करावा. जर आपल्या महाविद्यालयातील रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीतर आपल्या संस्थेविरुध्द कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडे पुढील शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून या अभ्यासक्रमासाठी शिक्षकांची पदे रिक्त आहेत त्या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करण्याबाबत शिफारस करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी.

( प्रा. न. बा. पासलकर )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.